# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३०१/२०२४ दिनांक- १६/०८/२०२४.

## "४ वर्षे फरार असलेल्या बलात्कारातील आरोपीत यास हरिव्दार, उत्तराखंड येथुन ताब्यात घेण्यात गुन्हे शाखा कक्ष ३ विरार यांना यश"

-------ooooo-------

दिनांक १६/०९/२०२१ रोजी सायंकाळी ०७.०० वा चे सुमारास यशवंत गौरव, नालासोपारा पश्चिम येथे यातील फिर्यादी पिडीत मुलगी वय १९ वर्षे ही घरात एकटी असतांना यातील आरोपीत अनिल बिडलान याने फिर्यादीचे तोंड हाताने दाबुन ठेवले व ओरडलीस तर मारुन टाकीन अशी धमकी देवुन फिर्यादीवर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर आरोपीत याने फिर्यादीस घडलेल्या प्रकारा बद्दल कोणास सांगीतले तर तुला मारुन टाकील अशी धमकी दिले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३९९/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७६, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयातील गंभीर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणे बाबत दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा गुन्हे शाखा कक्ष-३ व्दारे समांतर तपासकरीत असतांना सदर गुन्हयातील आरोपीत हा हरिव्दार, उत्तराखंड येथे आपले अस्तित्व लपवुन राहत असले बाबत गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने आरोपीत नामे अनिल ओमप्रकाश बिडलान, रा. गोकुळधाम सोसायटी, ऑक्सफर्ड स्कुल जवळ, नवोदय नगर, सेक्टर ४ भेल, हरिव्दार, राज्य उत्तराखंड यास हरिव्दार येथुन ताब्यात घेण्यात आले आहे. उक्त आरोपी यास पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३९९/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७६, ५०६ प्रमाणे या गुन्हयात हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण,सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोज तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/संतोष चव्हाण, सायबर सेल यांनी पार पाडली आहे.




**--------------00000-------------**